
MAHARASHTRA TIMES 27 NOVEMBER 1994

# बालशिक्षणाचे आद्य प्रणेते : गिजुभाई बधेका

**पंधरा नोव्हेंबर रोजी प्रा. राम जोशी यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय 'महाराष्ट्र बालशिक्षण परिषद' स्थापन झाली. भारतातील बालशिक्षणाचे प्रणेते गिजुभाई बधेका यांचा हा जन्मदिवस. त्यांच्या एक सहकारी – ताराबाई मोडक यांनीच गिजुभाईंचा जन्मदिन हा 'बालशिक्षण दिन' म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. बालशिक्षणाला शासनमान्यता नि लोकमान्यता मिळण्यासाठी काय करावे लागेल याचा यानिमित्ताने हा ऊहापोह.**



आधुनिक पद्धतीच्या शास्त्रीय बालशिक्षणाचा उदय, भारतात, विसाव्या शतकाच्या सुरुवातीसच झाला आणि तोही मॉंटेसरींच्या बालशिक्षणविषयक तत्त्वज्ञानाच्या आधारे. मॉंटेसरीबाईंच्या पुस्तकांचे इंग्रजीत भाषांतर १९१२ च्या सुमारास होऊन, त्यानंतर थोडक्याच काळात ही पुस्तके येथील सुशिक्षितांच्या हातात पडली. मुंबईच्या टाइम्स ऑफ इंडियामध्ये १९१४ साली या पुस्तकांवर परीक्षणे प्रसिद्ध झाली आणि नंतर अनेकांचे लक्ष या नव्या तत्त्वज्ञानाकडे वळू लागले. असे जरी असले तरी बालशिक्षणाच्या विचाराची आणि बालशाळांच्या प्रसाराची पावले फारच मंदगतीने पडत होती. अगदी स्वातंत्र्यकालापर्यंत आणि नंतरही काही वर्षे प्राथमिकपूर्वी 'बिगरी'चे वर्ग अस्तित्वात होते. अर्थात शाळेत जाण्याचा थोडासा सराव व्हावा आणि प्राथमिकची थोडी पूर्वतयारी व्हावी यापलीकडे 'बिगरी'च्या अस्तित्वाला फारसा शास्त्रीय हेतू असावा असे वाटत नाही.

ज्या काही थोड्या लोकांना, बालकाच्या स्वातंत्र्याचा नि स्वयंशिक्षणाचा हा नवा विचार पटला त्यांनी तो प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने प्रयत्नही सुरू केले. तत्कालीन बडोदे संस्थानचे दरबार श्री. गोपाळदास यांनी श्री. मोतीलाल अमीन यांच्या सहाय्याने, बडोदे संस्थानात 'वसो' या गावी १९१५ साली पहिली मॉंटेसरी पद्धतीची शाळा सुरू केली. याच वर्षी श्रीमती सरलादेवी साराभाई यांनी स्वतःच्या कुटुंबांतील मुलांसाठी, विलायतेहून शिक्षक आणि बालशिक्षणाची साधने मागवून, आपल्या घरीच शाळा सुरू केली. श्री. गिरजाशंकर बधेका या वकिलीपेशाच्या गृहस्थांची, याचवर्षी, श्री. गोपाळदास यांची सौराष्ट्रमधील वढवाण या गावी भेट झाली. या भेटीतच प्रथमतः गिजुभाईंना मॉंटेसोरींची माहिती झाली. त्यांनी, केवळ पुस्तकांचे सखोल वाचनच केले असे नाही तर स्वतःच्या मुलावर त्यांनी त्यांचे यशस्वी प्रयोगही केले.

वाचन, मनन आणि प्रयोग यांतून बालशिक्षणाची मॉंटेसरींची नवीन विचारधारा गिजुभाई बधेकांच्या मनात रुजली आणि आपला वकिलीपेशा सोडून त्यांनी पुढील सारे आयुष्य बालशिक्षणाची, त्याच्या नवविचारांची वकिली करण्यातच व्यतित केले.

**पहिले बालमंदिर**

भावनगरच्या दक्षिणामूर्ती भवन संस्थेत १९२० साली मॉंटेसरी पद्धतीची पहिली बालशाळा उघडून तिला 'बालमंदिर' असे नाव गिजुभाईंनी दिले. पुढे १९२४ साली तत्कालीन मुंबई राज्यांतील पहिले बालमंदिर अहमदाबाद येथे सुरू झाले. हळूहळू इतरही ठिकाणी परंतु सामान्यपणे सुशिक्षितांच्या मोहल्यांतूनच मॉंटेसरी पद्धतीच्या शाळा उघडल्या जाऊ लागल्या.

बालशिक्षणाच्या या सुरुवातीच्या इतिहासात गिजुभाई बधेका यांना अग्रस्थान द्यावे लागते ते अनेक कारणांमुळे. इतरही काही लोकांप्रमाणे त्यांनीही एक बालशाळा सुरू केली, ती चालवून नावारूपाला आणली हे तर खरेच; पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे त्यांनी आपल्या शाळेंतील बालशिक्षणाला प्रयोगांची जोड दिली. मॉंटेसरीचे नुसते विचार आत्मसात करून ते थांबले नाहीत तर ते विचार प्रत्यक्ष शाळेच्या पातळीवर त्यांनी पडताळून पाहिले. मुलांचे मानस समजावे म्हणून त्यांनी 'अवलोकन' पद्धतीचा विकास केला. असे म्हणतात की, मुलांना विविध साधनांवर खेळायला सोडून ते वर्गाचे दार बंद करून घेत आणि दाराला मुद्दाम पाडलेल्या भोकामधून बाहेरून ते तासन् तास मुलांचे अवलोकन करून नोंदी घेत असत.

गिजुभाईंचे बालशिक्षणामधील कार्य किती विविधांगी होते ते त्यांच्याच कार्याच्या अवलोकनाने सहज लक्षात येईल. मॉंटेसरीबाईंनी इटालीत १९०७ साली स्वतःची शाळा – बालघर - सुरू करताना त्यांच्यासमोर इटालीमधील, म्हणजे पाश्चात्य देशातील, पाश्चात्य संस्कृतीतील मुले होती. त्या संस्कृतीत आणि भारतीय संस्कृतीत जमीन-अस्मानाचा फरक. त्यामुळे, मॉंटेसरीबाईंची बालशिक्षणाची तत्त्वे जरी आत्मसात केली तरी त्यावर भारतीय कलम केल्याशिवाय त्यांचा शैक्षणिक हेतू साध्य होणे शक्य नाही याची जाण गिजुभाईंना होती. त्यामुळे त्यांनी, मॉंटेसरीबाईंचे गुरुपण आणि ऋण मान्य करूनही, स्वतःची भारतीय परिस्थितीत अधिक सुसंगत ठरेल अशी नवीन पद्धती प्रयोगान्ती सिद्ध केली. त्यालाच पुढे त्यांनी बालशिक्षणाची 'नूतन' पद्धती असे नाव दिले.

**शिक्षण नव्हे, संस्कार**

बालशिक्षण हे पाटी-पेन्सिलीच्या सहाय्याने देण्याचे शिक्षण नाही. किंबहुना पाटी- पेन्सिल- पुस्तके- दप्तर ही सामान्यतः कोणत्याही प्राथमिक व त्यापुढील शिक्षणातील सर्व साधने बालशिक्षणात पूर्णतः वर्ज्य आहेत. वास्तविक या सहा वर्षांच्या आतील वयाला द्यायचे असते ते शिक्षण नव्हे तर संस्कार ! 'शिक्षण' असा शब्द वापरून आणि त्यातही अत्यंत अजागळ असा 'पूर्वप्राथमिक शिक्षण' असा शब्दप्रयोग करून आपण बालशाळांचा खेळखंडोबा केला आहे. लेखन- वाचन- गणित ही पुढच्या म्हणजे प्राथमिकच्या स्तरावरची शिक्षण साधने आहेत. बालवाडीतील साधने वेगळी आहेत. खेळ, गप्पा, गोष्टी, गाणी, नाच, चित्रे अशी अनेक. पुढे जे शिक्षण घ्यायचे, त्याच्या क्षमता विकसित करण्याचे हे वय असते. त्यामुळे, शारीरिक, मानसिक, बौद्धिक नि सामाजिक क्षमतांच्या विकासाला वाव मिळेल अशा अनेक खेळरूपी साधनांचे विश्व मॉंटेसरीपासून आजपर्यंत विकसित होत गेले आहे. बालशिक्षणाला 'पूर्वप्राथमिक' म्हटल्याने हे सारे विश्व उधळून मिथ्याच तेथे पाटी पेन्सिल पुस्तकाने ठाण मांडून शिक्षक आणि पालक या दोन्ही वर्गांना अगतिक बनविले आहे.

बालशिक्षणातील साधनांचे महत्त्व ओळखून त्यासंबंधीचा विचार प्रगत करण्याचे एक महत्त्वाचे कार्य गिजुभाईंनी आपल्या सहकाऱ्यांच्या सहाय्याने केले आहे.

बालशाळांमधून पुस्तकांना स्थान नाही; परंतु बालशाळांतून ज्यांचा साधनभूत वापर करावयाचा अशा वाङ्मयाची, गोष्टी-गाण्यांची अतोनात गरज आहे. आणि हे बालाभिमुख वाङ्मयाचे महत्त्व जाणून गिजुभाईंनी याही क्षेत्रांत उदंड झेप घेतली आहे. शंभराच्यावर त्यांची बालवाङ्मयाची पुस्तके आहेत. लहान मुलांच्यात अत्यंत प्रिय ठरलेले हे वाङ्मय पाहूनच काका कालेलकरांनी गिजुभाईंना 'बालसाहित्याचा ब्रह्मा' अशी पदवी प्रदान केली होती. बालसाहित्याबरोबरच बालशिक्षणविषयक वैचारिक वाङ्मयही गिजुभाईंनी विपुल प्रमाणात लिहिले आहे. त्यांचे बरेचसे वाङ्मय शिक्षकांना नि पालकांना बालमानस समजावून देणारे आहे. कित्येकदा घरगुती लहान लहान प्रसंगांचे वर्णन करून त्याचे 'बालशास्त्रीय' विश्लेषण ते शिक्षक-पालकांसमोर ठेवीत असत. कित्येक पालकांना तर आपल्या घरात घडलेले अनेक प्रसंग गिजुभाईंच्या पुस्तकांतून आढळत. त्यामुळे गिजुभाईंना, सूक्ष्म होऊन आपल्या घरात प्रवेश करण्याची किमया प्राप्त झाली आहे असेच अनेक पालकांना वाटत असे.

बालशिक्षणविषयक या आनुषंगिक पण अतिशय महत्त्वाच्या बाबींबरोबरच, गिजुभाईंचे सगळ्यात महत्त्वाचे कार्य कोणते असेल तर ते म्हणजे, बालशाळांच्या प्रसारासाठी आणि या संदर्भात आवश्यक त्या समाजप्रबोधनासाठी व्यापक अशी राष्ट्रीय पातळीवरील चळवळ उभारण्याचे.

**प्रचार आणि प्रसार**

गिजुभाईंनी, ताराबाई मोडक आणि आपल्या अन्य सहकाऱ्यांच्या समवेत 'नूतन बाल शिक्षण संघ' १९२५ साली स्थापन केला. शास्त्रीय पायावरील बालशिक्षण गावागावांतून पसरावे यासाठी त्यांनी प्रचाराचे आणि प्रसाराचे कार्य अंगावर घेतले. सहा वर्षांच्या आतील मुलांसाठी, या वेगळ्या प्रकारच्या शाळा उभ्या रहाव्यात म्हणून व्यापकतेने जनमानस तयार व्हायला हवे होते. अशा शाळांतून मुलांना धाडण्यासाठी, पालकवर्गाचेही रास्त असे प्रबोधन व्हायला हवे होते. म्हणून या प्रचार-प्रबोधनासाठी १९२६ साली, नूतन बालशिक्षण संघाची 'शिक्षणपत्रिका' प्रथमतः गुजरातीत आणि मग १९३३ साली मराठीत व १९३४ साली हिंदीमध्ये सुरू केली. या मासिकांकरवी बालशिक्षणाचा संदेश गावागावांतून आणि घराघरांतून पोचविण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

नूतन बालशिक्षणाची ही चळवळ पुढे ताराबाई मोडक यांच्या मदतीने गुजरात नि मध्य प्रदेशाबरोबरच, महाराष्ट्रातही पसरली. गिजुभाईंचे, १९३९ साली वयाच्या अवघ्या चोपन्नाव्या वर्षी निधन झाले. त्यांच्यानंतर, ताराबाई मोडक यांच्या नेतृत्वाखाली ही नूतन बालशिक्षणाची चळवळ पुढे वेगाने पसरत गेली. तिला ग्रामीण आणि त्यातही आदिवासींच्या शिक्षणाचे नवे परिमाण लाभले. गिजुभाईंनी सुरू केलेले, या क्षेत्रातील संशोधनाचे कार्यही ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ या दोघींनी पुढे अर्धशतकभर चालू ठेवले.

आज गावोगाव आणि गल्ल्या-सोसायट्यांमधून अक्षरशः हजारो बालवाड्या, अंगणवाड्या, मॉंटेसोरी किंवा किंडरगार्टन शाळा चालू आहेत. आता, सामान्यतः बालशिक्षण हे नवलाईचे राहिलेले नसून सरावाचे झालेले आहे. प्रामुख्याने गिजुभाई बधेकांपासून सुरू झालेल्या बालशिक्षणाच्या व्यापक चळवळीचे हे श्रेय आहे.

१५ नोव्हेंबर हा गिजुभई बधेकांचा जन्मदिन. त्यांच्या मृत्यूनंतर हा दिवस 'बालशिक्षण दिन' म्हणून साजरा करण्यास ताराबाई मोडक यांनी सुरुवात केली.

हा बालशिक्षण दिनाचा मुहूर्त साधून, बालशिक्षणाच्या या चळवळीचे दुसरे पर्व 'महाराष्ट्र बालशिक्षण परिषदे'च्या रूपाने सुरू झाले आहे. गिजुभाई-ताराबाईंचा शास्त्रीय बालशिक्षणाचा आग्रह धरून, शाळाशाळांतून शिक्षणाचा दर्जा सुधारावा, बालशिक्षणाचे क्षेत्र आजच्यासारखे दुर्लक्षित न राहता, त्याला जनमानसात त्याचे रास्त स्थान प्राप्त व्हावे, आणि या प्रयत्नांना हातभार लावण्यासाठी शासनानेही आपले बालशिक्षणविषयक धोरण जाहीर करावे व बालशिक्षणाला पायाभूत शिक्षण म्हणून दर्जा प्राप्त करून द्यावा अशा त्रिविध उद्दिष्टांनी ही राज्यपातळीवरील 'महाराष्ट्र बालशिक्षण परिषद' स्थापन करण्यात आली आहे.

बालशिक्षणाच्या शास्त्रीय विचाराला शासनमान्यता नि लोकमान्यता प्राप्त झाल्यास हे बालशिक्षणाच्या चळवळीचे दुसरे पर्व योग्य दिशेने जात आहे असे मानता येईल.

—रमेश पानसे